My जालना
पुढारी गुरुवार, २ ऑगस्ट २०१८

पुढारी

# साधन असून चालत नाही साधना झाली पाहिजे : गायकवाड यांचे प्रतिपादन



**जालना : मत्स्योदरी अभियांत्रिक महाविद्यालयात पालक मेळाव्याचे दीपप्रज्वलन करताना डॉ. बी. आर. गायकवाड व इतर.**

**जालना :** मैं किसीको नौकरी नाही मांगूंगा, नौकरी के लिए बुलाने को विवश करुंगा या वाक्याने मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड यांनी मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या १ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेल्या प्रथम वर्ष विद्यार्थी-पालक मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांना चांगले व्यक्तिमत्त्व, कौशल्य आणि ज्ञान आत्मसात करा तसेच साधन असून यशस्वी होता येत नाही तर अभ्यासामध्ये साधना महत्त्वाची असते, असे प्रतिपादन केले. यावेळी प्रास्ताविक करताना विद्यार्थी हा आता ज्ञान व कर्मयज्ञाकडे वाटचाल करतो आहे आणि प्रत्येक विद्यार्थ्याने संघर्ष करून ध्येय साध्य करता येते. हे एका उदाहरणावरून प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख प्रा. के. व्ही. देशमुख यांनी स्पष्ट केले. अभियांत्रिकीचे दर्जेदार शिक्षण हे जालन्यात मिळत असताना विद्यार्थी पुणे मुंबईसारख्या शहरात जाऊन कशाला शिक्षण घेतात, असे प्रतिपादन प्रातिनिधिक स्वरूपात लाभलेले पालक अग्रवाल यांनी केले. अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊनसुद्धा विद्यार्थी हे स्पर्धा परीक्षेसाठी जाऊ शकतो, असे प्रतिपादन पालक पवार यांनी केले.

दिव्य मराठी
जालना जिल्हा
जालना. शुक्रवार, ३ ऑगस्ट २०१८

# 'साधन असून यशस्वी होता येत नाही, अभ्यासात साधना महत्वाची'



मत्स्योदरी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थी-पालक मेळाव्याचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. बी.आर.गायकवाड, प्रा. के. व्ही. देशमुख आदी.

प्रतिनिधी । जालना

विद्यार्थ्यांनो चांगले व्यक्तिमत्व, कौशल्य आणि ज्ञान आत्मसात करा तसेच साधन असून यशस्वी होता येत नाही तर अभ्यासामध्ये साधना महत्वाची असते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बी.आर. गायकवाड यांनी केले.

मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थी-पालक मेळाव्यात बोलत होते. व्यासपीठावर प्रा. के. व्ही. देशमुख, अग्रवाल, पवार आदींची उपस्थिती होती. विद्यार्थी हा आता ज्ञान व कर्मयज्ञाकडे वाटचाल करतो आहे आणि प्रत्येक विद्यार्थ्यांने संघर्ष करून ध्येय साध्य करता येते, असे गायकवाड यांनी स्पष्ट केले. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. एस.के.बिरादार यांनी विद्यार्थ्यांनी जर बदल घडवायचा असेल तर अभ्यासामधील प्रत्येक गोष्टींमध्ये सातत्य हवे असेल तर हे १००% वर्गातील उपस्थितीवर अवलंबून आहे, असे सांगितले. त्यानंतर उपप्राचार्य प्रा. रवींद्र करवंदे यांनी महाविद्यालयाची सुविधा व माहिती प्रेझेंटेशनद्वारे पालकांना व विद्यार्थ्यांना दिली. मदिना शेख, अनिता मदन यांनी मागील वर्षाचा अनुभव व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहिल जैस्वाल, कोमल चिंके यांनी तर प्रा.बालाजी सूर्यवंशी यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी डॉ. सुजाता पाटील, प्रा.गुणवंत शेळके, प्रा.रवींद्र तोडकर, प्रा विकास कुलकर्णी, प्रा.दत्तात्रय सोळंके आदी उपस्थित होते.

दैनिक आनंद नगरी
जालना नगरी
गुरूवार, दि. २ ऑगस्ट २०१८

दैनिक आनंद नगरी
जालना नगरी
Thursday 2018/08/02

# केवळ साधन असून चालत नाही, साधना केली पाहिजे

## बी.आर.गायकवाड यांचे प्रतिपादन

जालना (प्रतिनिधी)– चांगल व्यक्तीमत्व, कौशल्य व ज्ञान आत्मसात करा. लक्षात ठेवा, केवळ साधन असून चालत नाही, साधना केली पाहिजे, असे प्रतिपादन मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी बी. आर. गायकवाड यांनी केले. मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात आयोजित प्रथम वर्ष विद्यार्थी – पालक मेळाव्यात ते बोलत होते. विद्यार्थी आता ज्ञान व कर्मयज्ञाकडे वाटचाल करतो आहे. आणि प्रत्येक विद्यार्थ्याने संघर्ष करून ध्येय साध्य करावे, असे आवाहन यावेळी अभियांत्रिकीचे विभागप्रमुख प्रा. के.व्ही. देशमुख यांनी केले. **(पान २ वर)**

### केवळ साधन असून चालत...

पुणे, मुंबई शहरात मिळणाऱ्या शिक्षणाच्या धर्तीवर अभियांत्रिकीचे दर्जेदार शिक्षण जालन्यात मिळत असल्याची भावना पालक श्री. अग्रवाल यांनी व्यक्त केली. अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊनही विद्यार्थी स्पर्धा परिक्षेत यश मिळवू शकतो, असे यावेळी पालक श्री. पवार यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी जर बदल घडवायचा असेल तसेच अभ्यासातील प्रत्येक गोष्टीकडे सातत्य हवे असेल तर हे विद्यार्थ्यांच्या वर्गातील १०० टक्के उपस्थितीवर अवलंबून असल्याचे प्राचार्य डॉ. एस.के. बिरादार यांनी केले. यावेळी उपप्राचार्य प्रा.रविंद्र करवंदे यांनी महाविद्यालयातील सुविधांची माहिती प्रेझेंटेशनद्वारे पालक व विद्यार्थ्यांना दिली. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.

पुण्यनगरी
smart Jalna
। जालना । गुरूवार,२ ऑगस्ट २०१८

साधन असून चालत नाही
साधना पाहिजे
4...

# साधन असून चालत नाही साधना पाहिजे

## डॉ.गायकवाड : अभियांत्रिकी महाविद्यालयात पालक मेळावा




**मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने बुधवारी पालक-विद्यार्थी मेळावा घेण्यात आला. यावेळी गुणवंत विद्यार्थिनी शीतल अग्रवाल हिचा सत्कार करताना प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड.**

**जालना/प्रतिनिधी**

'मै किसीको नौकरी नही मागूंगा, नौकरी के लिये बुलाने को विवश करुंगा' असे सांगून विद्यार्थ्यांना चांगले व्यक्तिमत्व, कौशल्य आणि ज्ञान आत्मसात करावे, तसेच साधन असून यशस्वी होता येत नाही तर, अभ्यासामध्ये साधना महत्वाची असते, असे प्रतिपादन मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड यांनी केले.

मत्स्योदरी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात आज बुधवारी घेण्यात आलेल्या प्रथम वर्ष विद्यार्थी-पालक मेळाव्यात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी डॉ. गायकवाड म्हणाले की, विद्यार्थ्यांनी ज्ञानाची साधना करावी. त्यामुळे आपल्याला कोणत्याही अडचणीचा सामना करण्याचे बळ मिळते असे सांगितले तर विद्यार्थ्यांनी जर बदल घडवायचा असेल तर अभ्यासामधील प्रत्येक गोष्टींमध्ये सातत्य हवे. असे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांनी सांगितले. यावेळी पालक अग्रवाल यांनी जालन्यातच चांगले दर्जेदार शिक्षण मिळत असेल तर पालकांनी पुणे मुंबईचा मोह टाळावा. यावेळी महाविद्यालयातील सुविधांची माहिती उपप्राचार्य प्रा.रवींद्र करवंदे यांनी प्रेझेंटेशनव्दारे विद्यार्थ्यांना करवून दिली. त्याच बरोबर मदिना शेख, अनिता मदन या विद्यार्थिनींनी अनुभव कथन केले. प्रास्ताविक प्रा. के. व्ही. देशमुख, सूत्रसंचालन साहिल जैस्वाल व कोमल चिंके तर . आभार प्रदर्शन प्रा. बालाजी सूर्यवंशी यांनी केले. यावेळी डॉ. सुजाता पाटील, प्रा. गुणवंत शेळके, प्रा. रवींद्र तोडकर, प्रा विकास कुलकर्णी, प्रा.दत्तात्रय सोळंके यांची उपस्थिती होती.